# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २९/०८/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### खून

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :–** अंतर्गत ०४ कि. मी अंतरावरील मौजा मोरारजी चौक जवळील बेडा जवळ, सालईदाभा ता. हिंगणा जि. नागपूर येथे दिनांक २८/०८/२०२२ चे २०.०० वा. पासुन ते २८/०८/२२ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गोपाल साधु राठोड वय १९ वर्ष रा. सालईदाभा ता. हिंगणा जि नागपूर धंदा–पशुपालन (दुध) हा घरी हजर असतांना पोही गावातील आरोपी क्र. १) मनिष वरठी हा फिर्यादीचे बेडा वर आला असता त्याला 'तु कोणाचा मुलगा आहे व इथे कशाला व कोणाकडे आलेला आहे' असे फिर्यादीचे काकाने विचारले. त्यावरून मनिष वरठी याने उदधटपणे बोलुन शिवीगाळ करून फिर्यादीचे काकाचे अंगावर गेला. त्यामुळे फिर्यादीचे काकाने त्याला थापड मारली या कारणावरून त्याने फिर्यादीला पाहुन घेण्याची धमकी देवुन निघुन गेला. काही वेळानंतर आरोपी क्र. १) मनिष वरठी, २) निलेश देवराव सलामे, वय ४१ वर्ष, रा. सालईदाभा ता. हिंगना जि. नागपुर, ३) दशरथ कवडुजी वरठी वय ४० वर्ष रा. पोही ता. हिंगना जि. नागपुर, ४) श्रावण कवडुजी वरठी वय ४२ वर्ष रा. पोही ता. हिंगना जि. नागपुर, ५) अतुल अशोक धुर्वे वय २८ वर्ष, रा. पोही ता. हिंगना जि. नागपुर, ६) राजेश किशन कोहळे वय ३५ वर्ष रा. पोही, ७) ज्ञानेश्वर बबन डेरकर, वय ३३ वर्ष रा. पोही ता. हिंगना जि. नागपुर व ८) रामकृष्ण सुर्यभान राउत, वय ३२ वर्ष, रा. पोही ता. हिंगना जि. नागपुर हे लाठी, दगड घेवुन आले व फिर्यादीचे काकाला व आजोबा यांना हातबुक्कीने मारू लागले. फिर्यादीचे आजोबा जेठाजी हिराजी मेहर(मृतक), वय ६७ वर्ष, रा. सालईदाभा ता. हिंगणा जि नागपूर हे खाली पडले. त्यांना उपचाराकरिता माया हॉस्पीटल, बुटीबोरी येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमा करून काठीने, दगडाने व हातबुक्कीने मारहाण करून फिर्यादीचे आजोबाचे मरणास कारणीभुत ठरले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०२, १४३, १४७, १४९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. २ ते ८ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अशोक कोळी मो नं. ९६५७८११११ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**